|| विद्या विनयेन शोभते ||
Mob.: 8669244522
JEEVANDEEP SHAIKSHANIK SANSTHA'S POI'S
ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE
(Affiliated to Mumbai University)
Mumbai University Affiliation No. Aff / Recog. /6403 of 2008 dt. 17th Oct. 2008
Govt. of Maharashatra Order No. NGC 2008 / (218 / 08) MS - 3, dt. 16/6/2008
At. Khardi (E), Tal. Shahapur, Dist. Thane Pin 421 601. • Website : www.jsspcollegekhardi.in • Email: jeevandeepkhardi@gmail.com

Ref. : JSSP/ACSCK /_____/

Date : ____________

**3.3.2.1 Number of books and chapters in edited volumes/ books published and papers published in national/ international conference proceedings per teacher during last five year**

**Year 2020-21**

**INDEX**

| Sr.No | Name of the teacher | Title of the book/ chapter/ paper Published | Year of the publication | ISBN Number |
|---|---|---|---|---|
| 1 | Kailas Kalkate | Dasavatar folk drama of Konkan | 2020-21 | 978-81-944-8561-2 |
| 2 | Vishal Bhosle | Metro Car Shed Project in Arey Colony, Mumbai, Natural Environment and Socio-Political Perspective: A Micro-Study | 2020-21 | 978-81-932-6229-0 |
| 3 | Kailas Kalkate | An understanding of Dalit women's autobiographies | 2020-21 | 978-93-904-8302-0 |

Principal
Jeevandeep Shaikshanik Sanstha Poi's
Art's, Commerce & Science College Khar
Khardi, Tal. Shahapur, Dist. Thane 421 60




# कोकण इतिहास परिषद

(जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, ता. कल्याण येथे संपन्न झालेल्या कोकण इतिहास परिषदेच्या ९व्या अधिवेशनात सादर झालेल्या वेचक संशोधन प्रपत्रांचा संग्रह )

**शोधनिबंध संग्रह (खंड-९)**

**आनंद विश्व गुरुकुल ज्येष्ठ महाविद्यालय, ठाणे**
**आणि**
**कोकण इतिहास परिषद**

Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com.& Science College
Khardi,
Tal Shahapur,
Dist. Thane,
421 601

ISBN: 978-81-944856-1-2

Konkan Itihas Parishad: Shodhnibandh Sangrah (Khand-9)

Chief Editor: Shri. Ravindra Dattatray Lad

Editors: Dr. Arun Joshi, Shri. Padmakar Shirwadkar,
Prof. Bharati Joshi, Prof. Vidya Prabhu

First Published: 2nd February 2020

© Konkan Itihas Parishad

All rights reserved. No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means without written permission of the copyright owner.

Printed at Snehal Printers and Book Binders, parbhani

Published by Dr Kalyan Gangarde *for* New Man Publication, Parbhani- 431401. Mob. + 91 9730721393, +91 9420079975

Setting and Cover by Dr. Kalyan Gangarde

Email. nmpublication@gmail.com
www.newmanpublication.com

**Disclaimer:** Articles in this book do not reflect the views or policies of the Editor or the Publisher. Respective authors are responsible for the originality of their views / opinions expressed in their articles / papers

**Price:** ₹ 250/-

Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College ★ Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

# कोकण इतिहास परिषद

शोधनिबंध संग्रह (खंड-९)

(जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, ता. कल्याण येथे संपन्न झालेल्या कोकण इतिहास परिषदेच्या ९व्या अधिवेशनात सादर झालेल्या वेचक संशोधन प्रपत्रांचा संग्रह )

प्रमुख संपादक

**श्री. रवींद्र दत्तात्रय लाड**

संपादन मंडळ

**डॉ. अरुण जोशी**

**श्री. पद्माकर शिरवाडकर**

**प्रा. सौ. भारती जोशी**

**प्रा. सौ. विद्या प्रभू**

न्यू मॅन पब्लिकेशन

www.newmanpublication.com

Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College
Khardi,
Tal Shahapur,
Dist. Thane,
421 601

| | | | |
|---|---|---|---|
| १२ | डॉ. आंधळे एस.बी. | नारायण मेधाजी लोखंडेंनी दीनबंधु पत्रातून केलेली मुंबईतील जनजागृती | १४६ |
| १३ | प्रा. प्रेरणा एस. राऊत | कोकणातील आदिवासी लोकसंस्कृतीत भगताचे स्थान | १५० |
| १४ | प्रा. युवराज सुभाष जाधव | पोलादपूरचा शिमगोत्सव | १५५ |
| १५ | प्रा. कविता हरिश्चंद्र मांजे | रायगड आणि ठाणे जिल्ह्यातील जत्रोत्सव | १६० |
| १६ | प्रा. कैलास कळकटे | कोकणातील दशावतार लोकनाट्य | १६८ |
| १७ | प्रा. राजाराम वामन कापडी | मुरबाडचा आधुनिक राजकीय इतिहास | १७२ |
| १८ | प्रा. सौ. गीता विशे | मुरबाडमधील पर्यटन अडचणी व उपाय | १७६ |
| १९ | श्रावण अहिलाजी केळकर मार्गदर्शक प्रा. लक्ष्मण नारायण भोईर | जीवनदीप शैक्षणिक संस्थेचा कला, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातील योगदान व इतिहास | १८२ |
| २० | अनिकेत भगवान पडवळ (बी.ए.प्र.वर्ष) मार्गदर्शक डॉ. विद्या प्रभू | अनपेक्षित साधने - अपेक्षित इतिहास दैनंदिन वर्तमानपत्राच्या एका वृत्तपत्रावरुन | १८६ |
| २१ | ऐश्वर्या जगदाळे, योगिता भातणे, कल्पेश टोकारे (बी.ए.तृ.वर्ष) | Bombay Society for The Prevention of Cruelty to Animals | १८८ |




Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College
Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

१६.

# कोकणातील 'दशावतार' लोकनाट्य

**प्रा.कैलास कळकटे**
मराठी विभाग प्रमुख,
जीवनदीप शैक्षणिक संस्था संचलित, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
खर्डी, ता.शहापूर, जि. ठाणे.

संस्कृती ही आदिम काळापासून माणसाच्या उत्क्रांतीतून आकाराला येत गेली. माणूस जीवन उत्क्रांत होताना त्याला सगळ्या बाजूंनी सुरक्षित करण्यासाठी जे काही करत जातो त्यातून 'संस्कृती' आकाराला येते. लोकजीवनात आढळणा-या चालीरीत,परंपरा, रुढी जेव्हा मनोरंजनाच्या स्वरुपात एका पिढीकडून दुस-या, दुस-याकडून तिस-याकडे मौखिक स्वरुपात लोकगीत, लोककला, लोकनृत्य, लोकनाट्य इ. जात राहतात आणि त्यातूनच 'लोकसंस्कृती' आकाराला येते. ही लोकसंस्कृती विशिष्ट प्रदेशातील लोकांच्या धारणा, गरजा, जगण्याविषयीचे समज, श्रद्धा इ. आकाराला येते. त्यामुळे प्रदेशनिहाय लोकसंस्कृती वेगवेगळया स्वरूपात आढळते.

सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे व मुंबई या पाच जिल्ह्यांच्या प्रदेशाला कोकण म्हणून ओळखले जाते. हा प्रदेश डोंगरद-यात, नद्या, जंगलात वसलेला आहे. त्यामुळे प्राचीन काळात अर्थार्जनासाठी व उपजीविकेच्या साधनांसाठी या प्रदेशातील लोक प्रामुख्याने शेती, डोंगरद-या, नदी, तलाव, समुद्र यावर अवलंबून होते. त्यामुळे निसर्गाच्या सानिध्यात वावरणा-या या लोकांनी स्वतःची अशी लोकसंस्कृती आकाराला आणली. तिलाच कोकणची संस्कृती म्हणून ओळखले जाते. कोकणाची लोकसंस्कृती म्हटल्याबरोबर आपल्या डोळ्यासमोर येतो तो 'दशावतार'.

**कोकणातील दशावतार लोकनाट्य -** कोकणातील दशावतार या लोकनाट्याला खूप मोठा इतिहास आहे. इ.स. १७२८ मध्ये शामजी नाईक काळे यांनी दशावताराचा पहिला प्रयोग आडिवरे इथे महाकालीच्या मंदिरामध्ये केल्याची नोंद मिळते. त्यांनी फक्त या कलेचा जीर्णोद्धार केला असावा असे वाटते कारण दशावताराचे उल्लेख रामदासस्वामींच्या दासबोध या ग्रंथामध्ये आढळतात. रामदासस्वामी दशावताराबद्दल असे लिहितात की -

"खेळता नेटके दशावतारी
तेथे येती सुंदर नारी



Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science
Khardi,
Tal. Shahapur,
Dist. Thana,
421 601
Jeevandeep ★ College

नेत्र मोडिती कलाकुसरी
परी ते अवघे थटिंगण''

(दासबोध, ६-८,११)

कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यात प्रामुख्याने दशावतार हे लोकनाट्य अस्तित्त्वात असल्याचे आढळून येते. आजही अनेक दशावतारी मंडळे तिथे कार्यरत आहेत.

**दशावतार** - दशावतार म्हणजे विष्णूने जे दहा अवतार धारण केले ते मत्स्य, कूर्म, वराह, नरसिंह, वामन, परशुराम, राम, कृष्ण, कलंकी व बुद्ध यापैकी पहिली चार रूपे मानवी नाहीत. ती प्राणी रुपे आहेत. नववा अवतार कलंकी व दहावा बुद्ध हे दोन अवतार 'दशावतारात' दाखवले जात नाहीत. ती सर्व पात्रे प्रत्यक्ष सभा मंडपात (रंगमंचावर) येत नाहीत. त्यातील काही प्रत्यक्ष रंगमंचावर येतात तर काहींचा उल्लेख केला जातो.

पूर्वरंगातील संकासूर, भटजी, गणपती, रिद्धी-सिद्धी, सरस्वती, ब्रह्मा, विष्णू ही पात्रे आणि उत्तरंगात रामायण, महाभारत या पुराणांमधील आख्यान असे दशावतार या लोकनाट्याचे स्वरूप असते. कोकणातील देवळी, लिंगायत आणि गुरव समाजाचे लोक गावोगावी जाऊन दशावतार सादर करतात. दशावतारी खेळाचा काळ साधारणपणे कार्तिक शुद्ध दशमीपासून ते वैशाख शुद्ध पंचमीपर्यंतचा (साधारणपणे ऑक्टोंबर - नोव्हेंबर ते एप्रिल - मे) या काळात रात्री दहा अकरा वाजता सुरू झालेला दशावतारी खेळ पहाट होईपर्यंत चालत असे. परंतु आता तीन ते चार तासात हा खेळ संपतो.

**दशावताराचे सादरीकरण** - दशावतार या लोकनाट्याला संहिता नसते. जी कथा या खेळासाठी सादर करावयाची आहे त्याचे प्रमुख सूत्र या नाट्याचा प्रमुख सूत्रधार किंवा मालक सर्व कलाकारांना ती कथा समजावून सांगतो. मग ही सगळी पात्रे उत्स्फूर्तपणे हे नाटक प्रेक्षकांसमोर सादर करतात. या लोकनाट्यात सूत्रधाराची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. हे लोकनाट्य पूर्वरंग व उत्तररंग या दोन भागांत विभागलेले असते. साधारणपणे पुढीलप्रमाणे दशावतार हे लोकनाट्य सादर केले जाते.

(पूर्वरंग)

प्रथम गणपतीला आवाहन

↓

नंतर रिद्धी-सिद्धीसहित गणपतीचे रंगमंचावर आगमन

↓



Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College
Khardi,
Tal Shahapur,
Dist. Thane,
421 601

मागोमाग सरस्वतीचे आगमन

↓

गणपतीचे आवाहन संपले की सूत्रधार सरस्वतीची पूजा करतो. सरस्वती त्याला आशीर्वाद देते. त्यानंतर तो आज कोणते नाटक सादर होणार आहे याची कल्पना प्रेक्षकांना देतो

↓

प्रत्यक्ष खेळाला सुरुवात

↓

२

संकासुराचा वध करुन (पूर्वरंग संपतो)

↓

(उत्तररंग)

दशावताराच्या उत्तररंगात एखादे आख्यान नाट्यरूपात सादर केले जाते. यालाच खेळ म्हणण्याची प्रथा आहे. साधारणपणे रामायण किंवा महाभारतातील एखाद्या विषयाची किंवा घटनेची निवड केली जाते. हे नाटक संपल्यावर प्रेक्षकांमध्ये ताळी फिरविली जाते आणि मग प्रत्येकजण आपापल्या कुवतीप्रमाणे त्यात पैसे टाकतात. गावातील काही लोक कलाकारांना खास बक्षिसी देतात.

दशावतारातील पेटारा - दशावतारात पेटा-याला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. हा पेटारा बांबूच्या काड्यापासून बनविलेला असतो. ह्या पेटा-याचे 'स्थानिक पेटारे' व 'फिरतीचे पेटारे' असे दोन प्रकार असतात. यातील स्थानिक पेटारे हे गावाच्या मालकीचे असतात. तर फिरतीचे पेटारे हे बहुतांश वैयक्तिक मालकीचे असतात. पेटारे गावाच्या श्रद्धेचा विषय असतात. कारण मुखवट्यांपासून वस्त्रांपर्यंत सारं सामान या पेटा-यात असतं. त्या अर्थाने पेटारा म्हणजे प्रतिसृष्टीच असते.

दशावताराची ठळक वैशिष्ट्ये -

१. प्राचीन लोकनाट्य प्रकार
२. दशावतार या लोकनाट्यात पेटारा ही महत्त्वाची संकल्पना आहे.
३. दशावतारी नाट्याची लिखित संहिता नाही.
४. संवादाची निर्मिती प्रत्यक्ष नाट्यातूनच आकाराला येते.
५. नाट्यात वाद्य, संगीत यांचा प्रभावी वापर केला जातो.
६. राक्षस पात्रांची रंगभूषा अधिक भडक तर देवांची सात्त्विक स्वरुपाची असते.



Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College * Jeevandeep
Khardi, Tal. Shahapur, Dist. Thane, 421 601

७. दोन पात्रांच्या युद्धाच्यावेळी ते जे काही आपल्या पदलालित्यातून सादर करतात त्याला लंगर असे म्हणतात.

८. वैशिष्ट्यपूर्ण रंगभूषा, उत्स्फूर्त संवाद आणि त्यानुसार होत जाणारा काहीसा भडक, परंतु पेक्षकांना आकर्षित करणारा अभिनय अशीही दशावताराची प्रभावी त्रिसूत्री आहे.

अत्यंत प्रभावी असणारा हा लोककला प्रकार आधुनिक काळानुसार बदलत आहे. तरीही आज त्याला पाहिजे तेवढे व्यापक रूप मिळालेले दिसत नाही. याच लोककला प्रकाराच्या जवळ जाणारा कर्नाटकातील 'यक्षगान' मात्र सातासमुद्रापलीकडे गेलेला दिसतो. त्याचा वेगळ्याप्रकारे शोध अभ्यासकांना घेता येईल.

□□□



Shaikshanik Sanstha's Arts, Com & Science College
Khardi
Tal Shahapur,
Dist. Thane,
421 601

# Proceedings of International Conference on

# 'Resource Management for Inclusive Development'

14th - 15th February 2020

Sponsored by

**Savitribai Phule Pune University**




साहसे श्रीः प्रतिवसति ।

Akole Taluka Education Society's,

**Agasti Arts, Commerce & Dadasaheb Rupwate Science College, Akole**

Tal.: Akole 422 601, District : Ahmednagar, Maharashtra, India.

(Re Accredited 'A' Grade by NAAC and Awarded 'Best College' By University of Pune)

**Maharashtra Bhugolshastra Parishad, Pune**

Ms. - Vishal S. Bhosale

 ISBN : 978-81-[illegible]

Proceedings of International Conference

on

# 'Resource Management for Inclusive Development'

**14th - 15th February 2020**

◆

Sponsored by

**Savitribai Phule Pune University**

◆

Organized by

साहसे श्रीः प्रतिवसति ।

Akole Taluka Education Society's,

**Agasti Arts, Commerce & Dadasaheb Rupwate Science College, Akole**

Post-graduate Research Center in Geography

Akole, Tal. - Akole, Dist. - Ahmednagar, 422 601 (M.S.)

◆

In Association with

**Maharashtra Bhugolshastra Parishad, Pune**

GATHA COGNITION

**Gatha Cognition**



Jeevandeep Shaikshanik Sanstha's Arts, Com. & Science College
Khardi,
Tal. Shahapur,
Dist. Thane,
421 601

ISBN : 978-81-932622

१२५ औरंगाबाद जिल्यातील मत्स्यव्यवसाय : एक अभ्यास ...
– सुंदर खरात, विजय बैसाणे

१२६ मानवी संसाधन व्यवस्थापन एक भौगोलिक अभ्या" ...
– येडे गौतम नागनाथ

१२७ ग्रामीण सेवा केंद्राचा भौगोलिक अभ्यास : विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा ...
– बालाजी आव्हाड, एस. जी. बिराजदार

१२८ "भारतातील वन साधनसंपत्तीचा भौगोलिक अभ्यास" ...
– प्रा.डॉ. दयानंद उजळंबे

१२९ जालना जिल्ह्यातील तालुकानिहाय गळीतधान्य पीक संयोगाचा भौगोलिक अभ्यास (इ.स.२०००–०१ ते २००४–०५) ...
– * राठोड सुनिल धोंडिराम ** मुळे अंबादास मारोतीराव

१३० नांदेड जिल्ह्यातील भूमी उपयोजनातील बदल : एक भौगोलिक अभ्यास (इ.स. १९९६ ते २००५) ...
– यु. एस. कानवटे

१३१ पडीक जमिनीचे संधारण काळाची गरज ...
– घुगे एस. पी.

१३२ पर्यावरण आणि विकास ...
– प्रा. डॉ. अनिल डी. पवार

१३३ प्राणहिता नदी खोऱ्यातील जलसिंचनाचा ेतीवर झालेला परिणाम ...
– डॉ. नागसेन नामदेव मेश्राम

१३४ आर्थिक विकासाचा पर्यावरणावर होणारा परिणाम ...
– गणेश एल. धोटे, जे. व्ही. दडवे, किशोर वाय ठाकरे

१३५ मुंबईच्या आरे कॉलनी परिसरातील मेट्रो कार शेड प्रकल्प, नैसर्गीक पर्यावरण आणि सामाजिक–राजकीय दृष्टीकोण : एक सूक्ष्म अभ्यास ...
– विशाल संपत भोसले

१३६ वने, आदिवासी आणि जंगल कामगार सोसायटी : एक अभ्यास ...
– १विठ्ठल मारुती पाटील, २हंगे ए. के.



Shaikshnik Sanstha's Arts, Com.& Science College
Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601
Jeevandeep *

# आर्थिक विकासाचा पर्यावरणावर होणारा परिणाम

गणेश एल. धोटे, जे. व्ही. दडवे, किशोर वाय ठाकरे
यशवंतराव चव्हाण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लाखांदूर, जि. भंडारा

**सारांश :** प्राचीन काळी मानवाच्या अन्न, वस्त्र व निवारा एवढ्याच मूलभूत गरजा होत्या. त्या पूर्ण करण्याकरिता आर्थिक क्रिया मर्यादित स्वरूपाच्या होत्या. परंतु जसजशी वैज्ञानिक प्रगती केली तसतश्या मानवाच्या गरजा वाढून नैसर्गिक संसाधनाचा वापर मोठ्या प्रमाणात होऊ लागला. आर्थिक विकास साधन असतांना पर्यावरणावर मोठ्या प्रमाणात आघात करून पर्यावरण असंतूलन होवून संपूर्ण परिस्थितीकी व्यवस्था धोक्यात आलेली आहे. आर्थिक विकास साधनांचा पर्यावरणातील संसाधनाचा विवेकपूर्ण, संसाधनावर भार पडणार नाही तर भावी पिढी करीता संसाधनाचे जतन होईल या दृष्टीने वापर करून पर्यायी संसाधनाचवा वापर आवश्यक आहे. भविष्यकाळ समृद्धी करीता पर्यावरणाचे संरक्षण करणे, जतन करणे व आर्थिक विकास साधणे शक्य आहे.

* * *

# मुंबईच्या आरे कॉलनी परिसरातील मेट्रो कार शेड प्रकल्प, नैसर्गीक पर्यावरण आणि सामाजिक–राजकीय दृष्टीकोण : एक सूक्ष्म अभ्यास

**विशाल संपत भोसले**
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, खर्डी.

**सारांश :** वर्तमानकाळात जवळपास सर्व शहरे प्रदूषण व इतर पर्यावर्णीय समस्यांच्या विळख्यात अडकलेली आहेत. शहरी भागातील घटते वनांचे प्रमाण व वाढते औद्योगिकीकरण यामुळे मोठी बिकट स्थिती निर्माण झालेली आहे. अशातच ज्या काही मोजक्या शहरी भागात थोड्या फार प्रमाणात नैसर्गिक वनस्पती अस्तित्वात आहेत, अशा ठिकाणी देखील विविध विकास प्रकल्प राबविण्याकरिता वनांची तोड केली जात आहे. परिणामी शहरी भागातील पर्यावर्णीय समस्यांत दिवसेन दिवस वाढ होत आहे. विविध प्रकल्पांकरिता ज्या प्रमाणात वनांची तोड केली जात आहे, तेवढ्या प्रमाणात वनांचे पुनरुज्जीवन, जतन, संवर्धन केले जाताना आढळत नाही. अशा अनेक कारणांमुळे शहरी भागातील पर्यावर्णीय समस्यांनी अधिकच गंभीर रूप धारण केलेले आहे. वाढत्या पर्यावर्णीय ऱ्हासामुळे पृथ्वीवरील मानवच नव्हेतर एकूणच सजीव सृष्टीच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झालेला आहे.

सदर प्रबंधात महाराष्ट्राची आर्थिक राजधानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबई शहराच्या उपनगरीय परिसरातील आरेकॉलनी येथील मेट्रोकारशेड प्रकल्प व याप्रकल्पास विविधस्तरातून केला जाणारा विरोध यावर



Shikshnik Sanstha's Arts, Com. & Science College Khardi, Tal. Shahapur, Dist. Thane, 421 601

 ISBN : 978-81-932622-9-0

भाष्य करण्यात आले आहे. मुंबई शहराच्या दृष्टीने आरे फार महत्वाची भूमिका पार पाडते. आरे कॉलनी हा मुंबई परिसरातील एकमेव वनाच्छादीत नैसर्गिक प्रदेश होय. मुंबई शहर व मुंबई उपनगर यांच्या दरम्यानचा संक्रमण प्रदेश म्हणून हा भाग ओळखला जातो. या प्रदेशात मोठ्या प्रमाणावर नैसर्गिक वनस्पती व वन्यजीव अस्थीत्वात आहे. शहराचे फुफूस म्हणून देखील आरेचीओळखआहे. येथील अरण्यांमुळे प्रदेशातील प्रदूषण, नद्यांचे पूर नियंत्रित राहण्यास मदत होते. या प्रदेशातील वैशिष्ट्यपूर्ण वन्यजीवांचे आरे हे आश्रयस्थाण आहे. हजारो जाती-प्रजातींचे पशुपक्षी तसेच वने या भागात आढळतात. त्यामुळे जनसामान्यांकडून या प्रकल्पास विरोध केला जात आहे. मानवी विकासाकरिता आधुनिकीकरण आवश्यक आहे तर सजीवसृष्टीच्या अस्तित्वाकरीता पर्यावर्णीय संतुलन राखणे देखील आवश्यक आहे. त्यामुळे अशा प्रकल्पांची आवश्यकता, त्याचे परिणाम, वस्तूस्थिती, पर्यायी व्यवस्था, सामाजिक व राजकीय दृष्टिकोन यांचे अध्ययन करणे महत्वाचे ठरते. तसेच अशा समस्यांवर सर्वसमावेशक उपयोजन सुचवणे आवश्यक आहे, जेणेकरून पर्यावर्णीय संतुलन राखून मानवी जीवन सुखकर, शाश्वत राखता येईल.

* * *

# वने, आदिवासी आणि जंगल कामगार सोसायटी : एक अभ्यास

**१ विठ्ठल मारुती पाटील  २ हंगे ए. के.**

१ महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर

२ शिवाजी महाविद्यालय, रेणापूर

**सारांश :** या शोधनिबंधात संशोधकाने कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड तालुक्यातील चिंचणे- कामेवाडी या आदिवासी गावातील वनसंपदा बाबतचा अभ्यास केला आहे. सदर शोधनिबंधासाठी आवश्यक असणारी माहितीचा उपयोगातून वनसंपदाबाबत जागृती होणेसाठी व बदलाची गरज आहे. तसेच वनसंपदाबाबत प्रादेशिक असमतोल ही संकल्पना कमी करून त्या क्षेत्राचा विकास करणे आवश्यक आहे, असे संशोधकाच्या निदर्शनास आले आहे.

* * *



Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College ★ Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

# दलित साहित्याचे बहुविध आयाम

संपादक
डॉ. ताहेर एच. पठाण



Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College ★
Khardi,
Tal Shahapur,
Dist. Thane,
421 601

दलित साहित्याचे बहुविध आयाम
Dalit Sahityachea Bahuvid Ayam
© सुरक्षित

▮ प्रकाशक । मुद्रक
रंगराव पाटील
प्रशांत पब्लिकेशन्स
३, प्रताप नगर, श्री संत ज्ञानेश्वर मंदिर रोड,
नूतन मराठा महाविद्यालयाजवळ,
जळगाव 425001.

▮ दूरध्वनी । वेब । ईमेल
0257-2235520, 2232800
www.prashantpublications.com
prashantpublication.jal@gmail.com

▮ आवृत्ती । आयएसबीएन । किंमत
ऑक्टोबर, 2020
978-93-90483-02-0
₹ 425/-

▮ मुखपृष्ठ । अक्षरजुळवणी
चंद्रकांत सातपुते
प्रशांत पब्लिकेशन्स

*e-Books are available online at* www.prashantpublications.com
**Prashant Publications** *app for e-Books*
kopykitab.com • amazon.com • play.google.com

*या पुस्तकातील कोणताही मजकूर, कोणत्याही स्वरूपात वा माध्यमात पुर्नप्रकाशित अथवा संग्रहित करण्यासाठी लेखक/प्रकाशक दोघांचीही लेखी पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे. तसेच मजकुराची जबाबदारी ही सर्वस्वी लेखकाची राहील. लेखकांनी मांडलेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*



Jeevandeep Shaikshnik Sanstha ... Com. & Science College ★
Khardi,
Tal Shahapur,
Dist. Thane,
421 601

# दलित साहित्याचे बहुविध आयाम

संपादक

**डॉ. ताहेर एच. पठाण**

Prashant

प्रशांत पब्लिकेशन्स

Shikshnik Sanstha's Arts, Com. & S...
Khardi,
Tal. Shahapur,
Dist. Thane.
421 601

४३. दलित स्त्रियांची आत्मकथने : एक आकलन....................२८४
- प्रा. कैलास कळकटे

४४. दलित साहित्य आणि संत साहित्य ....................२८९
- डॉ. अशोक उ. घोळवे, कृष्णा उत्तम नागरे

४५. दलित नाटकांचे समाज जागृतीतील योगदान....................२९६
- डॉ. राखी सिद्राम सलगर

४६. दलित साहित्याची पार्श्वभूमी....................३०१
- प्रा. संध्या जंजाळ

४७. प्रेमानंद गज्वी यांच्या नाट्यकृतीतील मानवी क्रौर्याचा शोध..........३०८
- अभिषेक राजेंद्र परब

४८. दलित आत्मकथने : समाज वास्तव आणि जीवनदृष्टिकोन..........३१७
- सुरवसे प्रकाश गणपती

४९. दलित साहित्य : एक दृष्टिक्षेप....................३२३
- स्वप्नील युवराज भोसले

५०. आंबेडकरी चळवळ आणि दलित साहित्य ....................३३१
- सुरेश देवचंद शिरसाट

५१. दलित साहित्याचे विशेष ....................३३७
- नेहा रतन बनसोडे

५२. दलित साहित्याची प्रेरणा आणि तत्त्वज्ञान ....................३४३
- आण्णासाहेब हंबीराव सोनवणे

५३. दलित साहित्याचे स्वरूप-विशेष ....................३४७
- सखाराम बाबूराव शिंदे

५४. जागतिकीकरण आणि दलित नाटक ....................३५५
- अरुणा मानिक गायकवाड

५५. दलित आंदोलनामध्ये विविध समाजसुधारकांचे योगदान ............३६०
- सौ. अर्चना वैजनाथ घोडके (शिंदे)

५६. दलित साहित्यातील एक वाङ्मय प्रकार : आत्मकथन ............३६८
- दिपक रायभान कारके



Shaikshnik Sanstha's Arts, Com & Science College
Khardi, Tal. Shahapur, Dist. Thane, 421 601

# दलित स्त्रियांची आत्मकथने : एक आकलन

– प्रा. कैलास कळकटे
जीवनदीप शै.सं.सं. कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय खर्डी, ता.शहापूर, जि.ठाणे

**गोषवारा :**

*मराठी वाङ्मयात साठोत्तरी कालखंडात दलित साहित्याचा उदय झाला. या वाङ्मयीन प्रवाहातील ठळक वाङ्मयप्रकार आत्मकथन हा आहे. दलित आत्मकथनांनी एका नव्या भावविश्वाचा परिचय करून दिला. त्यातही दलित स्त्रियांनी लिहिलेली आत्मकथने ही अतिशय वेगळ्या स्वरूपाची आहेत. हे आत्मकथने एका बाजूला स्वतःचे दुःख तर दुसऱ्या बाजूला समस्त स्त्रीजातीचे दुःख मांडत जातात. त्यामुळे एक वेगळेच विश्व या आत्मकथनातून वाचकांसमोर येते. जवळपास १५ दलित स्त्रियांनी आत्मकथन लिहिले आहेत.*

**प्रस्तावना :**

मराठी वाङ्मयात १९६० नंतर एक ठळक वाङ्मयीन प्रवाह म्हणून दलित साहित्याचा उदय झाला. या वाङ्मयीन प्रवाहाने मराठी वाङ्मयाच्या कक्षा अधिक विस्तारित केल्या. एक नवे अनुभवविश्वच या वाङ्मयप्रवाहाने मराठी साहित्याला बहाल केले ते पुर्णपणे नवे होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे या प्रवाहाचे प्रेरणास्थान आहेत. त्यांनी परिवर्तनवादी चळवळीच्या माध्यमातून दलित समाजामध्ये जे 'आत्मभान' जागृत केले त्याचे रूपांतर म्हणजे हा प्रवाह. कारण आत्मभान आल्यानंतर दलित समाजातील लेखक आत्मशोध घेऊ लागले. या आत्मशोधाच्या जाणिवेतूनच या प्रवाहाचा उदय झाला. हा आत्मशोध त्यांनी कविता, कथा, कादंबरी, नाटक आणि आत्मकथन या वाङ्मयप्रकाराच्या माध्यमातून घेतला त्यातूनच आत्मभान, आत्मशोध, नकार आणि विद्रोह, बांधिलकी हे या प्रवाहातील साहित्याचे स्वरूप विशेष ठरले.

दलित साहित्याच्या माध्यमातून शतकानुशतके दाबून ठेवलेल्या भावनांचा उद्रेक झाला. तो उद्रेक वेगवेगळ्या वाङ्मयप्रकारातून व्यक्त होऊ लागला. हा उद्रेक कविता आणि आत्मकथन या दोन वाङ्मयप्रकारातून अधिक व्यक्त झाला. गतकाळात त्यांनी जे भोगले होते, सोसले होते याची तसेच या 'भोगवट्यास' जबाबदार असणाऱ्या व्यवस्थेविषयीची चीड त्यांनी त्यातून व्यक्त केली. पण कविता या वाङ्मयप्रकाराच्या काही अंगभूत मर्यादा असल्यामुळे हा उद्रेक आत्मकथना...



Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College ★
Khardi,
Tal Shahapur,
Dist. Thane,
421 601

अधिक प्रभावीपणे व्यक्त होऊ लागला. त्यातूनच 'आत्मकथन' हा एक नवीन वाङ्मयप्रकाराच दलित साहित्याने मराठी साहित्याला बहाल केला.

**दलित स्त्रियांची आत्मकथने :**

आजपर्यंत जवळ जवळ ७०-७५ आत्मकथने प्रकाशित झालेली आहेत. त्यापैकी सुमारे १५ आत्मकथने ही स्त्रियांची आहेत. तसे पाहिले गेले तर 'आत्मकथा' या वाङ्मयप्रकाराचा उदय मिलिंद महाविद्यालयाच्या 'अस्मिता' या वार्षिकांकातून झाला आहे. कारण या वार्षिकांकात खेड्यातील विद्यार्थ्यांनी आपल्या आठवणी सांगितल्या. त्यापैकीच एक असलेल्या प्र.ई सोनकांबळे यांनी त्या अधिक विस्ताराने आणि सलगरूपात सांगितल्या आणि त्यातूनच त्यांचे 'आठवणीचे पक्षी' हे आत्मकथन सिध्द झाले. त्यानंतर मात्र दलित समाजातील अनेकांनी आत्मकथने लिहिली. त्यातून दलित आत्मकथनांची एक लाटच निर्माण झाली. त्यांनी दलित साहित्याचेच नव्हे तर संपूर्ण मराठी साहित्यातील आत्मचरित्रांचे दालन त्यामुळे अत्यंत श्रीमंत होणार आहे.[१] असे प्रा बाळकृष्ण कवठेकर यांनी नोंदविले आहे. आजवरच्या संपूर्ण दलित आत्मकथांकडे पाहिल्यानंतर यातील सत्यताही पटते.

पुरूषांच्या आत्मकथनांपेक्षा दलित स्त्रियांची आत्मकथने अधिक प्रभावी वाटतात कारण समाजव्यवस्थेने सर्व हक्क नाकारलेला, दास्यात जीवन जगणारा दलित समाज आणि त्या समाजातील शेवटचा घटक स्त्री आहे. दलित स्त्री दलित तर आहेच, पण दलितामधील स्त्री असल्याने दुहेरी शोषण, दुःख तिच्या वाट्याला आले.[२] त्यामुळे पुरूषांच्या आत्मकथनांपेक्षा स्त्रियांची आत्मकथने महत्त्वाची ठरतात.

दलित स्त्रियांच्या आत्मकथनांचा विचार करताना दलित स्त्रीचे पहिले आत्मकथन कोणते याबाबत अभ्यासकांमध्ये मतभेद आहेत. या सर्व मतभेदांचा विस्तृत आढावा डॉ मनोहर जाधव यांनी आपल्या 'समीक्षाग्रंथात'[३] घेतला आहे. त्यानंतर निष्कर्ष नोंदवताना ते म्हणतात, आत्मकथन या संज्ञेनुसार दलित स्त्रीचे पहिले आत्मकथन म्हणून प्रा.कुमुद पावडे यांच्या 'अंत:स्फोट'चा निर्देश करावा लागतो तर आत्मचरित्र या संज्ञेनुसार शांताबाई कांबळे यांच्या 'माझ्या जल्माची चित्तरकथा' या आत्मचरित्राला पहिलेपणाचा मान द्यावा लागतो. जनाबाई गिऱ्हे यांच्या 'मरणकळा' या आत्मकथनाला भटक्या महिलेचे पहिले आत्मकथन संबोधावे लागते.[४] असे असले तरी पहिले स्त्रीलिखीत आत्मकथन म्हणून आपणास 'माझ्या जल्माची चित्तरकथा' याचा उल्लेख करावा लागेल. कारण मे १९८६ ला पुस्तकरूपाने प्रकाशित झालेले पहिले आत्मकथन आहे.

माझ्या जल्माची चित्तरकथा हे शांताबाई कांबळे यांचे आत्मकथन १९८२-८३ या कालावधीत 'पूर्वा' मासिकातून क्रमशः प्रसिद्ध झालेले आहे. तसेच हे



Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College ★
Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

आत्मकथन दुरदर्शनवर मालिकेच्या स्वरूपातही आलेले आहे. नाजाचे (शांताबाई कांबळे यांचे बालपणीचे नाव) बालपण सातवी पर्यंतचे शिक्षण, आई, मोठी बहीण, वडील यांचा मृत्यु आणि शिक्षिकीपेशा यात आलेले दाहक अनुभव शिक्षण अधिकारी म्हणून निवृत्ती इथपर्यंतचा जीवनप्रवास या आत्मकथनातून उलगडत जातो.

प्रा.कुमुद पावडे यांनी अंत:स्फोट मध्ये विविध प्रकारचे अनुभव चित्रित केले आहे. हे आत्मकथन प्रकाशित होण्यापुर्वी अस्मितादर्श या नियतकालिकामधून क्रमशः प्रसिद्ध झालेले स्फूट लेखन आहे. या आत्मकथनातून काही प्रमाणात स्त्रीवादही डोकावताना दिसतो. कारण लहानपणापासून हुशार असणारी ही मुलगी जातीमुळे कशी उपेक्षित ठरविली जाते. याचे चित्रण या आत्मकथनातून येते. तसेच शिकून मोठे झाल्यानंतर फक्त जातीमुळे कशी हीन प्रकारची वागणूक मिळत जाते याचे चित्रणही या आत्मकथनातून येते. त्याचप्रमाणे घडलेल्या घटनेवर त्यांचे भाष्य करतात त्यातून त्यांच्यावरील फुले-शाहू-आंबेडकर-सावित्रीबाई फुले यांच्या प्रभावाचे दर्शन घडते. हे आत्मकथन एका बाजूला स्वतःचे दुःख तर दुसऱ्या बाजूला समस्त स्त्रीजातीचे दुःख मांडत जाते.

स्त्रियांच्या आत्मकथनातील बेबीताई कांबळे यांचे जिणं आमुचं हे आत्मकथन वेगळ्या स्वरूपाचे आहे. कारण या आत्मकथनातून लेखिकेच्या वैयक्तिक जीवनाऐवजी मोठ्या प्रमाणात धर्मांतरापूर्वीच्या महार समाजाचे चित्रण येते. यापुर्वीच्या कोणत्याही आत्मकथनातून एवढ्या बारकाव्यांसह महारवाड्याचे व तिथल्या रूढी-प्रथांचे चित्रण आलेले नाही किंबहुना भावी पिढीला तत्कालीन समाजजीवन उलगडून दाखविणे, त्यांचे दुःख, वेदना सांगणे हा त्यांचा हेतू असावा असे वाटते. हे आत्मकथन समाजविज्ञानाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असे आहे.

मिटलेली कवाडे या मुक्ता सर्वगौड यांच्या आत्मकथनाचे स्वरूप थोडेसे भिन्न आहे. कारण त्या सामजिक कार्यकर्ती असल्यामुळे या आत्मकथनातून मी ऐवजी समाज अधिक प्रगट होतो. आणि त्यांचा हेतूही तोच असावा असे वाटते कारण वैयक्तिक जीवनातील अनेक घटना त्या टाळताना दिसतात. तसेच बालपणीच्या आठवणीत आईवडिलांविषयीचे काही उल्लेख येताना दिसतात. पण लग्नंतरचे जवळपास सगळे उल्लेख त्यांनी टाळलेले आहेत. त्यामुळे या आत्मकथनातून मी वर म्हणजेच मुक्ता सर्वगौड यांच्यावर प्रकाश पडण्याऐवजी तो तत्कालीन समाजजीवनावर पडलेला दिसतो.

रात्रंदिन आम्हा हे आत्मकथन शांताबाई दाणी यांचे आहे. हे नाव परिवर्तनवादी चळवळीतील अत्यंत महत्त्वाचे नाव आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मानव



Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College
Khardi,
Tal Shahapur,
Dist. Thane,
421 601

मुक्तीच्या लढ्यात त्यांनी अविवाहित राहून आयुष्यभर काम केले. परिवर्तनवादी चळवळीतील सगळी स्थित्यंतरे त्यांनी अत्यंत जवळून बघितली आहेत. त्यामुळे हे आत्मकथन एका बाजूला त्यांचे जीवन उकलत जाते तर दुसऱ्या बाजूला परिवर्तनवादी चळवळीचे अनेक पदरही उलगडत जाते. त्याचप्रमाणे दादासाहेब गायकवाड यांची व्यक्तिरेखाही या आत्मकथनामध्ये महत्त्वाची आहे. त्यांचे चळवळीविषयी असलेल्या बांधिलकीचे सुंदर चित्र या आत्मकथनातून उभे राहाते.

उर्मीला पवार यांचे आयदान हे आत्मकथन दलित स्त्रियांच्या आत्मकथनातील अत्यंत वेगळ्या स्वरूपाचे आत्मकथन आहे. २००३ साली हे आत्मकथन प्रकाशित झाले आहे. त्यामुळे जागतिकीकरणानंतर दलित स्त्रियांच्या जीवनात झालेल्या उलथा-पालथीविषयी नेमकेपणाने माहिती या आत्मकथनातून येते. एका सर्वसामान्य दलित स्त्रीला आलेल्या आत्मभानाचे यातील चित्रण स्तिमित करणारे आहे. अर्थात हे आत्मभान आत्मकेंद्री नसून सामाजिक जाणिवेने उजळलेले आहे. लेखिकेचे बालपण कोकणात गेले असल्यामुळे तेथील निसर्गाचे अत्यंत मनमोहक वर्णन या आत्मकथनात येते तसेच तिथली बोलीभाषा, सांस्कृतिक परंपरा, चालिरिती, श्रद्धा अशा अनेक गोष्टी या आत्मकथनातून आपल्यासमोर येतात. थोडक्यात उर्मीला पवार यांनी या आत्मकथनातून आयुष्याचेच आयदान विणले आहे.

मल्लिका अमर शेख यांचे 'मला उद्ध्वस्त व्हायचंय' हे आत्मकथन अनेक अंगांनी महत्त्वाचे आहे. कारण एका बाजूला त्या शाहीर अमर शेख यांच्या कन्या आहेत.तर दुसऱ्या बाजूला नामदेव ढसाळ यांच्या पत्नी आहेत. या आत्मकथनात दुःख वेदना तर आहेच पण त्यापेक्षा अनेक ठिकाणी 'स्त्रीवाद' ही ठसठसीत स्वरूपात व्यक्त होताना दिसतो.

'मरणकळा' हे जनाबाई गिऱ्हे यांचे आत्मकथन असून यातून 'गोपाळ' या भटक्या जमातीचे तत्कालीन वास्तव डोळ्यासमोर येते. 'शिक्षणासाठी संघर्ष' हे या आत्मकथनाचे मध्यवर्ती सूत्र आहे. असे वाटते. रूढी, परंपरांनी झगडत, दुःख, वेदना, हाल-अपेष्टा यांच्या 'मरणकळा' सोसत त्यांनी कसे शिक्षण घेतले आणि शिकल्यानंतर कोण-कोणत्या संकटांना सामोरे जावे लागले याचे चित्रण या आत्मकथनातून येते. तसेच त्यातून 'गोपाळ' समाजाचेही चित्र वाचकांच्या समोर उभे राहते.

या दलित स्त्रियांच्या आत्मकथनांनी मराठी साहित्य विश्वात मोलाची भर घातली आहे. दलित स्त्रीने आपल्या सर्व वेदनेला अत्यंत तरल, स्त्री सुलभ नैसर्गिक जाणिवेने नेटक्या शब्दात मांडले. या स्त्रियांनीही वेशीबाहेरच्या जगातले बारकावे टिपले. पण स्वतःच्या स्त्रीत्वाच्या मर्यादा त्यांनी काटेकोरपणे जाणीवपूर्वक पाळल्या.



Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com.& Science College
Khardi,
Tal Shahapur,
Dist. Thane,
421 601

हिंदू धर्माने लादलेल्या गुलामीतून दलित स्त्री मध्ये पोसत गेलेली अंधश्रद्धा, वाईट रूढी-प्रथा, सासुरवास, पोतराज सोडणे, सटवाई पुजणे इ अनेक गोष्टींचा मात्र खूप मोकळेपणाने उल्लेख अनेक दलित स्त्री आत्मकथनात आढळून येतो.[५] यामुळेच दलित स्त्रियांची ही आत्मकथने वेगळी ठरतात. ही आत्मकथने 'मी'चे जेवढे चित्रण करत जाते तेवढेच चित्रण 'समुहा'चेही करते. त्यामुळे एका बाजूला हे आत्मकथने वाङ्मयाचा अस्सल दस्तावेज ठरतो तर दुसऱ्या बाजूला समाज विज्ञानाचाही दस्तावेज ठरत जातो.

**ठळक निष्कर्ष :**

१. पुरूषांच्या आत्मकथनांपेक्षा दलित स्त्रियांची आत्मकथने अधिक प्रभावी वाटतात

२. सगळ्या हाल-अपेष्टा सहन करत आत्मभान कसे जागृत केले याचे प्रत्ययकारी चित्र या आत्मकथनात दिसते.

३. दलित स्त्रियांनी आत्मकथनाच्या लेखनात वेशीबाहेरच्या जगातले बारकावे टिपले. पण स्वत:च्या स्त्रीत्वाच्या मर्यादा त्यांनी काटेकोरपणे जाणीवपूर्वक पाळल्या दिसतात.

४. काही आत्मकथनामधून जागतिकीकरणानंतर दलित स्त्रियांच्या जीवनात झालेल्या उलथा-पालथीविषयी नेमकेपणाने माहिती आलेली दिसते.

५. या दलित स्त्रियांच्या आत्मकथनांनी मराठी साहित्य विश्वात मोलाची भर घातली आहे.

**संदर्भ ग्रंथसूची**


१. कवठेकर बाळकृष्ण, दलित साहित्य : एक आकलन पृ.७७

२. लुलेकर प्रल्हाद, वेदनांचा प्रदेश, पृ ३०

३. जाधव मनोहर, दलित स्त्रियांची आत्मकथने : स्वरूप आणि चिकित्सा, पृ ३९

४. उनि पृ ४३

५. गरूड श्यामल, दलित स्त्री आत्मकथने, पृ १३




Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com.& Science College
Khardi,
Tal Shahapur,
Dist. Thane,
421 601